# लोककला उगम, विकास व सद्य:स्थिती

## चर्चासत्र लेखसंग्रह



संपादक

शाहीर विजय जगताप

# लोककला उगम, विकास व सद्यःस्थिती


• संपादक •

**शाहीर विजय रामचंद्र जगताप**

अध्यक्ष, शाहिरी व लोककला अकादमी, इचलकरंजी.

• सहसंपादक •

**प्राचार्य डॉ. पुरंधर नारे**

नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड कॉमर्स, इचलकरंजी.

• सहसंपादक •

**प्रा. डॉ. सयाजीराव गायकवाड**

• संपादक मंडळ •

**प्रा. एफ. एन. पटेल** | **प्रा. सौरभ पाटणकर**

**प्रा. ज्ञानेश्वर कांबळे** | **प्रा. सौ. सविता डोईजड**

# .... अनुक्रमणिका ....

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लोककला उगम, विकास व सद्य:स्थिती | वीना रमेश गुलदेवकर | १ |
| २. | गजीनृत्य | श्री. लक्ष्मण भानुदास साठे | १३ |
| ३. | लोककलांचा उपासक : पोतराज | प्रा. जे. छी. चंदनशिवे | १९ |
| ४. | **Cultural City, Kolhapur** | डॉ. अनिल जांभळे | २२ |
| ५. | मराठी लोककला एक जागर | डॉ. रेश्मा पाटील | २७ |
| ६. | लोकसाहित्य सामाजिक अनुबंध | प्रा. श्रद्धा सुरेश पाटील | ३० |
| ७. | मराठी पोवाडा : उगम, विकास व सद्य:स्थिती | डॉ. सयाजीराव गायकवाड | ३२ |
| ७. | मराठवाड्यातील लोककला : सद्य:स्थिती | शाहीर अंबादास तावरे | ३८ |
| ८. | तमाशा लोकनाट्य : बदलते प्रवाह | डॉ. राखि सिद्राम सलगर | ४२ |
| ९. | उखाणा : परंपरा व सद्य:स्थिती | कु. भारती कोळेकर | ४६ |
| १०. | लोकगीत : विवाह से संबंधित गीतों के भावों का निरुपण | डॉ. गीता दोडमणी | ६३ |

# मराठी उखाणा : परंपरा व सद्य:स्थितीचे आकलन

**प्रस्तावना**

महाराष्ट्र हे उत्सवप्रिय राज्य आहे. दसरा, दिवाळी, नागपंचमी, मकरसंक्रांत, मंगळागौरी, ज्येष्ठागौरी, श्रावण महिन्यातील शुक्रवार हे सर्व उत्सव, विवाह, बारसे इ. विधी मराठी माणूस मोठ्य प्रमाणावर साजरा करतो. उत्सव म्हणजे आनंद, प्रेम, मांगल्य याचे प्रतीक असते. श्रावण महिना हा तर या सर्व उत्सवांचा प्रमुख महिना. यावेळी निसर्ग फुलं, फळं नैसर्गिक संपन्नता, सुबत्ता यांनी नटलेला असतो. वातावरणात एक प्रकारचा गारवा–गोडवा अशी मनाला आल्हाद देईल अशी परिस्थिती असते. अशावेळी सण वार उत्सवाच्या निमित्ताने सासुरवाशीण मुलींना माहेरी बोलावून तिचे कोडकौतुक करण्याची संस्कृती मराठी समाजात आहे. विशेषत: नागपंचमी, मकरसंक्रांत, मंगळागौरी, ज्येष्ठागौरीअशा सणांच्या निमित्ताने या मुली माहेरी येतात. प्रिय सख्यांना, जीवाभावाच्या बालमैत्रिणींना भेटतात. अन मग स्वाभाविक या सासुरवाशीणी माहेर व सासरच्या सुखदु:खाची गाणी गाऊ लागतात. यावेळी कोण एखादी नववधु असेल तर तिला मुद्दामहुन सगळ्यजणी जवळ बोलावून घेतात व आपल्या पतीचे नांव घ्यायला सांगतात. असे नाव घेण्याच्या पध्दतीला उखाणा असे म्हणतात. अगदी लहान अविवाहीत मुलींपासून ते वृध्द सुहासिनीपर्यंत सगळ्य स्त्रिया उखाणा घेताना दिसून येतात. या उखाण्यांचा लोकसाहित्यामध्ये फारसा विचार झालेला दिसून येत नाही. परंतु असे लयबध्द, पल्लेदार, उच्चप्रतीचे, आशयसमृध्द उखाणे घेणाऱ्या सुहासिनींना कार्यक्रमांमध्ये मोठा मान दिला जातो. केवळ स्त्रियाच नव्हे तर पुरूषही उखाणे घेताना दिसून येतात. या सर्व उखाण्यंचा प्रस्तुत लेखातून विचार करण्याचा मानस आहे.

**उखाणा संकल्पना व अर्थ**

मराठी विश्वकोशामध्ये उखाण्याच्या विविध व्याख्या दिल्या आहेत.

१. महाराष्ट्रात लग्न, डोहाळजेवण, बारसे, हळदीकुंकू इ. समारंभात ज्या एका विशिष्ट पध्दतीने स्त्रिया तीचे नाव घेतात त्या पध्दतीस उखाणा म्हणतात.

२. कोडे किंवा कूटप्रश्न हा सुध्दा उखाण्याचा एक अर्थ आहे.

३. टोमणेवजा प्रश्नोत्तरांनाही उखाणा असे म्हणतात.

**उखाण्याचे हेतू / उद्दिष्ट्ये**

उखाणे घालून एखाद्याला विचारप्रवण करणे, त्याचे बुध्दीचातुर्य पडताळणे, बोध

अथवा उपदेश करणे, नीतीदर्शन करणे, मनोरंजन करणे, ज्ञानवृध्दी करणे, बुध्दीला उजाळा देते, विनोदनिर्मिती करणे, एखाद्याची टर उडविणे अथवा टवाळी करणे, फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग करणे असे अनेक हेतू उखाण्यांचे स्वरूप पाहता दिसून येतील.

## उखाणा या शब्दाला पर्यायी शब्द

मराठी विश्वकोशात उखाण्याला 'आहण', 'आहाणा', उमाणा' असे प्रतिशब्द दिले असून उखाण्याला संस्कृतमध्ये प्रहेलिका व हिंदीत 'पहेली' असे म्हणतात. 'पहेली' ही प्रहेलिकेचा अपभ्रंश आहे. तर ग्रामीण भागात यालाच 'हुमान', 'उमान', 'आयना' असे शब्द आहेत.

भारतीय संस्कृतीकोशामध्ये उखाण्याला 'आहाणा', 'कोहाडा', 'उमानं' किंवा 'उमाणं' असे प्रतिशब्द दिले असून बंगालीत याला 'धामघा', कानडीत 'आंगणु', तेलगुत 'विडीकथ' व तमिळ आणि मल्याळम्‌मध्ये 'विडिकदाई' असे प्रतिशब्द दिले आहेत (पृ.क्र.५९२)

गुजरातीमध्ये 'उखाणो', राजस्थानीत 'गूढा', 'आडी', उर्दूत 'प्रतियोगिता', सिंधीत 'उखाणी'[२] तर पाश्चिमात्य देशातही 'उखाणा' प्रचलीत असल्याचे संदर्भ आढळतात. उखाण्याला इंग्रजीत "Riddle', Quiz, जर्मनमध्ये 'Raetsel' तर ग्रीकमध्ये "Enigma 'असे पर्यायी शब्द आहेत.[३]

## उखाण्याची परंपरा

भारतामध्ये अतिप्राचीन काळापासून म्हणजेच वेदकाळापासून उखाण्याची परंपरा असल्याचे दिसून येते. वेदात 'ब्रह्मोद्य' नावाने उखाणे असत. 'ब्रह्मोद्य म्हणजे ब्रम्हाला किंवा आध्यात्मिक प्रश्नाला अनुलक्षून केलेली उक्ती' असे दुर्गा भागवत सांगतात. यामध्ये दोन्ही बाजूने प्रश्नोत्तराच्या स्पर्धा होत असत. अश्वमेध यज्ञाच्यावेळीही पुरोहित एकमेकांना उखाणे घालत असल्याचे उल्लेख वैदिक ग्रंथात आढळतात. ब्रह्मोद्यात प्रश्नोत्तर स्वरूपात उखाणे असले तरी ते कुटात्मक होते.

तसेच ऋग्वेद, यजुर्वेदातही उखाणे आढळतात. त्यामुळे वेदकाळात कुटात्म उखाण्यांची परंपरा होती हे लक्षात येते. याशिवाय ब्राम्हणग्रंथ, उपनिषदामध्ये 'विवाद' या नावाने उखाणे सापडतात. यानंतर महाभारतातही बंदी व अष्टावक्र यांच्या प्रश्नोत्तरांना 'विवाद' असेच म्हटले आहे. महाभारतात 'विवाद' हा शब्द 'उखाणा' या अर्थाने योजला असल्याचे डॉ. शरद व्यवहारे सांगतात. वनपर्वातयक्षाने युधिष्ठिराला विचारलेले प्रश्न उखाण्यांच्या सारखेच आहेत. यामधील यक्ष व युधिष्ठिर यांची कुटात्मक प्रश्नोत्तरे ही वेस्वण जातकातही आढळतात. महाभारताच्या शांतिपर्वातही ब्रह्मोद्याला यक्ष प्रश्नांचा पर्याय मानले आहे. परंपरागत यक्षपूजेत प्रश्नोत्तर/पहेली

सोडविण्याचे विधान आहे. ब्रम्होद्य, विवाद, प्रहलिका व कूट या नावांनी प्रचलित असणाऱ्या उखाण्यांची परंपरा अतिप्राचीन म्हणजेच वेद काळापासून आजपर्यंत अखंडपणे सुरू असल्याचे दिसून येते.

**उखाण्याचे स्वरुप**

उखाणे हे प्रामुख्याने कूटात्मक असून त्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन घटक असतात. पूर्वार्धात एखादा सूचक प्रश्न विचारला जात असून उत्तरार्धात त्याचे उत्तर दडलेले असते. हे उत्तर लपविण्यासाठी एखाद्या रूपकाचा आश्रय घेतला जातो. म्हणजेच पूर्वार्धात एखादा आशय गोपनीय ठेवायचा व उत्तरार्धात या गोपनीय तत्वाचा/अर्थाचा स्फोट करायचा असे त्याचे स्वरूप होय. 'गोपन' हा उखाण्याचा प्राण आहे. यामधील रूपके, प्रतिमा कधी–कधी काव्यमय असतात.तसेच त्यांना धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अथवा व्यावहारिक असे काही संदर्भही प्राप्त झालेले असतात. याशिवाय त्यांना वाङ्मयीन सौंदर्यही लाभलेले असते.

उदा: पाऊस नाही पाणी नाही, रान कसं हिरवं?
कात नाही चुना नाही, तोंड कसं रंगलं ? (उत्तर: पोपट)

यामध्ये हिरवे रान म्हणजे पोपटाचे शरीर असून एऱ्हवी रानात पाऊस पडल्यानंतरच चहुकडे हिरवळ पसरते. पण पोपटाचे शरीर मात्र पावसापाण्याशिवाय हिरवे असते. तसेच दुसऱ्या ओळीत त्याच्या लाल चोचीविषयी प्रश्न सूचित केला असून या रुपकांच्या आधारे पोपटाची शारीरिक लक्षणे सूचित केलेली आहेत.

उखाण्यासाठी प्रश्न विचारणाराव उत्तर देणारा अशा किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते. यामधून दोघांनाही आनंद मिळतो. प्रश्नकर्त्याला मोठ्य चातुर्याने भ्रमजाळांची गुंफण करावी लागते यातून त्याला क्रीडेचा आनंद मिळतो. तर उत्तर देणाऱ्यालाही बुध्दी चातुर्याला आवाहन देत गुंफणाची उकल करावी लागते. यामुळे दोघेही कुशाग्र बुध्दीचे, कुशल निरीक्षक व चिंतनशील बनतात. मनोरंजनाबरोबर बुध्दीचातुर्यास आवाहन देणे हा याचा हेतू असतो. आज प्रचलित असलेल्या उखाण्यांचे प्राचीन स्वरूप पहिले तर उखाण्यांची प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा लक्षात येईल.

**ब्रह्मोद्य**

उखाण्याचे वैदिक नांव 'ब्रह्मोद्य' होय. भारतीय संस्कृतिकोशात 'धार्मिक कूटप्रश्नांना 'ब्रह्मोद्य' म्हटले आहे. कूट आणि ब्रह्मोद्य हे शब्द एकाच अर्थाचे आहेत. 'अश्वमेध यज्ञ' किंवा 'दशसत्र' अशासारख्या मोठ्य यज्ञकर्मात 'ब्रह्मोद्य' हा एक आवश्यक भाग असतो. ४ राजसूय यज्ञावेळी अश्वमेधात पुरोहित एकमेकांना जे उखाणे घालत त्याला उद्देशून हा शब्द आलेला आहे. ब्रह्मोद्यात दोन्हीं बाजूंनी प्रश्नोत्तरे व स्पर्धा होत असे.

यज्ञात देवतांना आवाहन करावे लागते. देव हे परीक्षाप्रिय असून त्यांना रहस्य आवडते म्हणून वैदिक काळातील लोक हे रहस्यमय उखाणे वापरत असावेत. 'ब्रह्मोद्य म्हणजे वेदकालीन कवींनी किंवा चारणांनी रचलेली व परंपरेने संकलित केलेली कूटकाव्याची अमोघ संपदा आहे' असे सांगून दुर्गा भागवत ब्रह्मोद्याचे यजुर्वेदातील पुढील उदाहरण देतात.

होता : आपल्या मार्गाने एकटाच कोण जातो?
नव्याने फिरून सदैव कोण जन्माला येतो?
थंडीला औषध कोणते?
धान्याच्या सर्वात मोठ्या कोठाराचे नांव काय?

अध्वर्यु : सूर्य आपल्या मार्गाने एकटाच जातो.
चंद्र नेहमी नव्याने जन्माला येतो.
थंडीवर विस्तव हे औषध.
पृथ्वी हे सर्वात मोठे धान्याचे कोठार.

यानंतर अध्वर्यु प्रश्न विचारतो व होता त्याची उत्तरे देतो. अशी प्रश्नोत्तरांची उलटसुलट मालिका ब्रह्मोद्यात चालू असते. ब्रह्मोद्यात ईश्वर व सृष्टीचे गुढ यांचा प्रतिकात्मक भाषेतून विचार केला गेला आहे. तसेच यक्ष प्रश्नांना पर्याय म्हणून ब्रह्मोद्याला मानले जाते. अथर्ववेद, केनोपनिषद व महाभारतातील शांतिपर्व यामध्ये ही उदाहरणे आढळतात. परंपरागत यक्षपूजेत प्रश्नोत्तर/पहेली सोडविण्याचे संदर्भ आढळतात. महाभारताच्या वनपर्वात यक्ष व युधिष्ठीर यांच्यातील संवाद म्हणजे यक्ष प्रश्नोत्तरेच होय. यक्षप्रश्नांच्या रूपात ब्रह्मोद्य, ब्रम्हनिरूपण करणाऱ्या अनेक उक्त्या आहेत.

ऋगवेदातही ब्रह्मोद्य स्वरूपाचा उखाणा पुढीलप्रमाणे दिला आहे.

'सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रमेको अश्वो वहति सप्तनामा।
त्रिनाभिचक्रमजरमनर्वं यत्रेमा विश्वा भुवनाधि तस्थुः॥'(ऋ.१.१६४.२)

अर्थ – सातजण एक एकचाकी रथ फिरवितात, तो रथ एक 'सात' नावाचा घोडा ओढतो. त्या चाकाला बिनधावेच्या आणि फिरताना न थांबणाऱ्या अशा तीन अऱ्या आहेत. त्या चाकांत प्राणिमात्र राहतात.

याचा आशय असा –सात पुरोहित यज्ञाच्या योगाने सूर्याचा रथ चालवतात. हा रथ सात घोडे ओढतात. सूर्यरथाच्या चालकाला तीन ऋतूंच्या तीन अऱ्या आहेत. व या ऋतुचक्रात सारे प्राणी जगतात.

यावरून वेदकालीन उखाण्यांचे स्वरूप लक्षात येते.

**प्रहेलिका / प्रहेली**

संस्कृतच्या महाकाव्यापासून 'प्रहेलिका' ची परंपरा असल्याचे दिसून येते. हे उखाणे कूटात्मक स्वरूपाचे असून महाभारतपूर्व काळात 'प्रवल्हिका' असे नांव होते. "मूळचा अर्थ लपविण्यासाठी दुसरा कोणतातरी अर्थ व्यक्त करायचा असा आतला एक व बाहेरचा एक असे दोन आशय कथन करतात. त्या 'प्रहेलिका' होत." तसेच दण्डीच्या मते, "खेळात किंवाक्रीडेत चतुरपणाने मनोरंजनासाठी लोकांनी – विद्वानांनी एकत्र येऊन केलेला संवाद म्हणजे प्रहेलिका." [६]

बुध्दीपरीक्षण करणे, निष्णात पंडित व अभिजात नागरिकांचे, ज्ञानीजनांचे मनोरंजन करणे असे प्रहेलिकेचे हेतू आहेत. तसेच ठसकेबाज रचना, कल्पनाचातुर्य, ऐकणाऱ्यांना संभ्रमात टाकणे, गोपन इ. महत्वाचे विशेष आहेत.दण्डीने प्रहेलिकेचा उपयोग खेळात चातुर्याने एकमेकांना रिझविण्यासाठी केला जातो असे म्हटले आहे. प्रहेलिका या आकाराने लहान असून पद्यात्मक असतात. यामध्ये गोपनाला प्राधान्य असून प्रश्नोत्तर रूपाला गौण स्थान असते. काही हिंदी प्रहेलिका पुढीलप्रमाणे –

* ऊपर आगि निचे पानी, बीच में बठ्ठे पंडित ज्ञानी।
बुझवलिया बुझै से बडा गियानी।। (नि. हुक्का–चिलम)

* पडी थी फूटी नही, टुकडा हो गया चार
बत्तीस हो गई ठिकरी, पंडित करो विचार ।। (नि.रात.)

* चटक चांदनी वाटोळंदार हळूच घालना दुखते फार (बांगडी)

* मव्हा मामाच्या शंभर गायी, पाहच्टे उठी कहि ना महि (चांदण्या)

* एवढासा गढू नी अन् त्याला पाहू मुळूमुळू रडू (कांदा)

* सूपभर लाहया त्यात एक रूपया (चांदण्या)[७]

खण खण कुदळी, मण मण माती, राजाला सापडले माणिक मोती, राजाने दिले राणीपाशी, राणीने ठेवले उशापाशी, हाय हाय करू काय,राजा मागील देऊ काय (गारा)

काही वेळा प्रहेलिकेच्या रचनेत आटोपशीरपणा व ठसकेबाजपणाही असत नाही. एखादी गोष्ट सांगून त्यात एखादे रहस्य दडविलेले असते. त्याची फोड करण्याचे आव्हान गोष्ट सांगणारा ऐकणाऱ्यास करतो. अशा रचना वेताळ पंचविशी, कथासरित्सागर, हातिमताईसारख्या कथांमधून दिसून येतात या प्रकारच्या प्रहेलिकांना कूट कथात्मक प्रहेलिका म्हणून ओळखले जाते व या कथात्मक प्रहेलिकांवरूनच मराठीत मोठ्य व लांबलचक उखाण्यांचा प्रकार रूढझाला आहे.' असे दुर्गा भागवत

सांगतात.

**कूट**

'कूट' या उखाणा प्रकाराचा अर्थ 'अडचणीत, कोड्यात, घोटाळ्यात टाकणारे ते 'कूट'असा आहे. हा प्रकार संस्कृतपासून विकसित झालेला असून संस्कृतात याला 'कुटाली', 'संकिर्ण', 'समानशब्द' अशी नावे आहेत. उखाण्यातील निदानाचे ठोकताळे बांधणे, निर्धारण करणे खूपच कष्टप्रद कार्य होय. कूटामध्ये वापरले जाणारे शब्द अनेक शास्त्रांच्या सूक्ष्म ज्ञानावर आधारित आहेत. पाश्चात्य साहित्यातही असे कुटात्मक उखाणे आढळतात. हिब्रु, रोमन, इंग्रजीमध्ये उखाण्यास वेगवेगळी नांवे आहेत. युनानी लोक उक्तीच्या व्दारा साहित्यातून उखाणे मांडतात.

कुटात्मक उखाण्यांचे हेतू, बुध्दीपरीक्षण व ज्ञानसंवर्धन करणे, ज्ञान देणे, मनोरंजनातून नैतिक उपदेश देणे इ.आहेत. कूटामध्ये प्रश्न व उत्तर असे स्वरूप असते. प्रश्नात रूपकामध्ये सत्य लपविलेले असते व उत्तरात त्याचा अविष्कार असतो. कुटांची शब्दरचना आकर्षक, सुश्लिष्ट व गूढ असते किंबहुना गुढतेमुळेच याला सौंदर्य प्राप्त होते.

भारतात वेदकाळापासून कूटांची परंपरा पहावयास मिळते. वेदपूर्वकाळातही विविध विधीप्रसंगी म्हणजेच यज्ञ, विवाह, अंत्यविधी इ.प्रसंगी कूटांचा वापर करण्याची प्रथा असावी असे म्हटले जाते. ही कुटे वेदांच्याही पूर्वीची असल्याचे ऋग्वेदातील कूटांवरून सुचित होते. तसेच वैदिक वाङ्मयात धार्मिक व धर्मनिरपेक्ष असे दोन्ही प्रकारचे कूट आढळतात. धार्मिक कूटे ही प्रामुख्याने विश्वोत्पत्ती किंवा तत्वज्ञानासंबंधी असतात. तर धर्मनिरपेक्ष कूटे कलात्मक व उपदेशात्मक असतात. वेदातील कूटामध्ये विश्वोत्पत्ती विषयक दृष्टान्त व रूपके असून ती पद्यत्मक व कल्पनाप्रचूर आहेत. त्यांची भाषा गूढ तसेच भाषा व आशय इतर स्तुतिपर रचनेहून वेगळा आहे. अशा प्रकारचे कुट पुढीलप्रमाणे —

अपश्यं गोपमनिपद्यमान मा च, परा च, पथिभिश्चरन्तम।

स सध्रीची: स विषूचीर्वसान आ वरीवर्ति भुवनेष्वन्त:।।

म्हणजे मी एक गुराखी पाहिला. तो खाली पडत नाही. तो आपल्या मार्गाने वर व खाली हिंडत असतो. जे एकत्र धावत जातात व ज्यांची पांगापांग होते त्या वस्त्रांचे आवरण तो स्वत:वर घेतो आणि विश्वासाने वर्तुळाकार फिरतो.

या ऋचेतील गुराखी म्हणजे 'सूर्य' असून त्याचे वस्त्र म्हणजे त्याची असंख्य किरणे होत. याच अर्थाचे मराठीतही कूट आहे. ते म्हणजे 'एक गुराखी एक लक्ष गायी राखी' व त्याचे उत्तरही सूर्य व त्याची असंख्य किरणे होत.

संत साहित्यातही कूटपर रचना काही संतांनी केल्याचे दिसून येते.

नीर समुद्र तो कोण। कोठे क्षिराब्धि आसने।।१।।

दधि समुद्र कोण्याठायी। खारा समुद्र कोण्या गृही।।२।।

रत्न समुद्र तो कोण। कोठे मदनाचे आसन।।३।।

मन समुद्र कोठे आहे। नामा म्हणे शोधून पाहे।।४।। (अभंग क्र.११७४)

नेत्र नीर समुद्र देखा। क्षीर सत्रावी ओळखा।।१।।

दधि समुद्र नाकी आहे। खारा शरीरी तो पाहे।।२।।

नाभी रत्नाकर देखा। माथा मदन ओळखा।।२।।

नामा म्हणे सांगू काय। मन समुद्र हृदयी आहे।।४।। (अभंग क्र.११७५)[१]

संत नामदेवांनी वरील पहिल्या अभंगात कूट प्रश्न विचारले असून दुसऱ्या अभंगात या प्रश्नांची उकल करून सांगितली आहे.

या कूट रचनेचा पुढे विकास होऊन प्रव्हलिका/प्रहेलिका हा प्रकार अस्तित्वात आला असल्याचे प्रभाकर मांडे 'मौखिक वाङ्मय परंपरेत' सांगतात.

## विवाद

ब्राह्मणग्रंथ व उपनिषदात 'विवाद' या नावाने उल्लेखलेला 'उखाणा' पहावयास मिळतो. विवादाच्या स्पर्धेत हार व जीत यांना महत्व असे. ब्रह्मोद्य व विवादात आध्यात्मिक माहितीला महत्व दिलेले आहे. वनपर्वात यक्षाने युधिष्ठीराला विचारलेले प्रश्न 'विवाद' म्हणूनच ओळखले जातात.

ब्रह्मोद्यालाच नंतर आख्यानाचे स्वरूप प्राप्त होऊन कालांतराने यालाच प्रश्नोत्तराचे रूप आले. त्यामुळेच महाभारतातील बंदी आणि अष्टावक्राच्या प्रश्नोत्तरांना 'विवाद' असे नांव पडले. महाभारतातील वनपर्वातील ३३ व्या अध्यायात अष्टावक्र व राजा यांच्यातील प्रश्नोत्तररूपी संवादाचे स्वरूपही विवादात्मक आहे.

राजा म्हणाला —झोपी गेल्यानंतरही कोणाचे डोळे मिटत नाहीत ? जन्म पावल्यानंतरही ज्यामध्ये हालचाल नसते असे काय आहे ? हृदय कोणाला नाही ? आणि वेगाने कोण वाहत असते ?

अष्टावक्र म्हणाला —झोपी गेल्यानंतरही माश्याचे डोळे मिटत नाहीत, अंडे उत्पन्न झाले तरीही त्यामध्ये हालचाल नसते, पाषाणाला हृदय नसते व नदी वेगाने वाहते.[१०]

सर्व याज्ञिक किंवा आध्यात्मिक विवादामध्ये स्पर्धा ही इतकी तीव्र होते की हरणाऱ्याला अतिशय मोठे द्रव्य किंवा प्रसंगी प्राणही जिंकणाऱ्यास द्यावे लागत. यक्ष व युधिष्ठीर यांच्यात जी प्रश्नोत्तरे झाली तीच प्रश्नोत्तरे बौध्द जातकातील वेस्सवन जातकातही आढळतात. म्हणजेच बंदी अष्टावक्र विवादातील प्रश्न, यक्ष—युधिष्ठीराच्या

संवादातील यक्षाने विचारलेले प्रश्न आणि वेस्सवन जातकातील प्रश्नोत्तरे यांचे स्वरूप सारखेच आहे. यावरून यज्ञाशी संबंधित विवाद, महाभारतातील यक्षप्रश्न आणि जातकातील प्रश्नोत्तरे हा क्रम पाहता एक गोष्ट लक्षात येते ती अशी की, कूट प्रश्नांची परंपरा मूळ यज्ञ परंपरेपासून हळूहळू सुटत जाऊन पुढे यक्षासारख्या अमानवी प्राण्याशी जोडली गेली व त्याहीपुढे जावून त्याचा संबंध मानवाशी आला. या परंपरेतूनच आध्यात्मिक प्रश्नोत्तरांची परंपरा पुढे चालत आली आहे. प्राचीन मराठी साहित्यात संतांनी वापरलेल्या कूट रचना व त्यानंतरच्या काळात शाहिरी परंपरेत शाहिरी कवन, कलगी तुरा अथवा सवाल–जवाब मधील कूटात्मक प्रश्नोत्तरी उखाणे नंतरच्या काळातील प्रश्नोत्तर विरहीत व नांव घेण्याच्या उखाण्यांची सुरवात झाली असावी. अशा उखाण्यांचे प्रकार पुढील प्रमाणे सांगता येईल.

**उखाण्याचे प्रकार**

उखाणे हे प्रामुख्याने कोडी किंवा कूट व साधा उखाणा अशा दोन स्वरूपात दिसून येतात.

**अ) कोडी किंवा कूट**

कोडे किंवा कूटाचा अर्थ गूढ अर्थाचे वचन होय. हे गूढ अनाकलनीय असले तरी त्यामध्येच त्याचे उत्तर दडलेले असते. प्रश्न व उत्तर या स्वरूपाचे हे उखाणे असतात. एखाद्या रूपकाच्या आश्रयाने एखादी गोष्ट लपविली जाते व उत्तरात गौप्यस्फोट केला जातो. 'गोपन' हा कूट प्रकारच्या उखाण्याचा प्राण होय. यामध्ये लौकिक कल्पकता अधिक असते. नेटकेपणा व हृदय असतात. तसेच सांस्कृतिक पार्श्वभूमीही विस्तृत आहे. मनोरंजनाबरोबर ज्ञान प्राप्तीचे उद्दिष्ट असल्याने उखाण्यांना विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. कोडी किंवा कूट उखाण्यांचे पुन्हा दोन प्रकार पडतात.

**१) प्रश्नार्थक रचनेची कोडी व २) प्रश्न विरहीत रचनेची कोडी**

अ १)प्रश्नार्थक रचनेची कोडी –

या उखाण्यांची रचना सुटसुटीत व लयबध्द असून यामध्ये प्रश्न विचारला जातो व उत्तर देणारा एका शब्दात त्याचे उत्तर देऊन त्यातील गोपनाचा स्फोट करतो. उदा.

सुटला नंदी, बांधील कोण?
सुपभर मोती, मोजेल कोण? (साप आणि चांदण्या)

अ२)प्रश्न विरहीत रचनेची कोडी–

या रचना प्रकारात प्रश्न विचारला नसला तरीही त्यात गोपन ही असतेच. उदा.

**ब) साधा उखाणा**

या उखाणा प्रकारात प्रामुख्याने पुढील प्रकार आढळतात.

या प्रकारच्या उखाण्यांचा संबंध खेळांशी जोडलेला असतो. महाराष्ट्रात झिम्मा–फुगडी, कोंबडा इ.खेळ खेळताना उखाणे घेण्याची पध्दत आहे. या प्रकारात दोन मुली/स्त्रिया फुगडी खेळतात. व फुगडी खेळावयाची म्हणजे उखाणाही घालता आला पाहिजे असा एक नियमच ठरलेला असतो. फुगडीसाठी एकमेकींचे हात–हातात येताच आपसूकच मुखावाटे शब्द बाहेर पडतात.

आपण दोघी मैत्रिणी जोडीच्या

हातात पाटल्या तोडीच्या

खोल खोल विहीरीत। उंच उंच चिरे।

तुझी माझी फुगडी। गरगर फिर।

फू बाई फू फूगडी, चमचम करतीय बुगडी

लाही बाई लाही, मक्याची लाही मुक्यानं फूगडी शोभत नाही.

फुगडी हा नाचाचा एक प्रकार असून तो विधीशी संबंधित असावा, परंतू कालौघात विधी नष्ट होऊन नाच व गीतांची अथवा मूळ प्रश्नोत्तरीत उखाण्यांची प्रथा बदलून तिचे रूपांतर प्रचलित उखाण्यांमध्ये झाले असावे. केवळ दोन ओळींची यमकानुप्रासयुक्त, लयबध्द, साधीसोपी पण ठसकेदार रचना असे तिचे स्वरूप होवून त्यासाठी उखाणा हीच संज्ञा वापरली गेली असावी.

हे उखाणे बहुतांशी दोन चरणी असतात. तर कधी तीन चरणी परंतु पहिल्या चरणाचा पुढच्या चरणाशी अर्थदृष्टया संबंध असतोच असे नाही. या उखाण्यांमध्ये कधी मैत्रीचा गौरव, कधी तिच्या भावी नवऱ्याची थट्टा मस्करी अथवा कुचेष्टाही केली जाते.

"पाट बाई पाट चंदनाचा पाट, पतिदेव बघत्यात माडीवर वाट"

"पिंगा बाई पिंगा चवळीच्या शेंगा, चवळीच्या शेंगेला दाणाच नाही,

मामाच्या लेकीला नाकच नाही."

"गुलाबाचे अत्तर डबीमध्ये, ................चा नवरा पेटीमध्ये

पाठीवर शेपटा लडबडतो, म्हातारा नवरा बडबडतो"

काही वेळेस या उखाण्यांचे स्वरूप प्रश्नोत्तराचेही असते. उदा.

प्रश्न–'समोर होता कोनाडा, त्यात होती शाई,एवढी मोठी झाली तरी लग्न केले नाही.'

उत्तर–'कोरा कागद, काळी शाई, माझ्या लग्नाची, तुला काय घाई'

यामध्ये एकमेकांची वर्मे काढून आपला वरचढपणा सिध्द करण्याची प्रवृत्ती असली तरी खेळाच्या निमित्ताने काहीतरी बोलून आपला प्रभाव पाडणे यासाठीही हे उखाणे म्हटले जातात.

## २.२ नाव घेण्याचे उखाणे

आपल्या प्रिय व्यक्तीचे नांव न घेण्याची/गुप्त ठेवण्याची परंपरा प्राचीन काळापासून आहे. किंबहुना ते एक संस्कृतीवैशिष्टय आहे. न्युझीलंडमधील सूर्यकथेत सिसिलीमधील व कोकणातील कथेत याचे संदर्भ आढळतात. टोपणनावाची पध्दतही यातून पडली असावी. मुला–मुलींना टोपणनावाने हाक मारणे, बायकोने नवऱ्याला अहो–जाहो, मालक, धनी, घरधनी इ. तर नवऱ्याने बायकोला अगं किंवा आपल्या मुलीच्या नांवाने हाक मारणे, आमची घरवाली, घरधनीन किंवा बायको किंवा मुलामुलींचे नाव घेवून 'त्याची आई' अशा पध्दतीने उल्लेख केलेला दिसून येतो.

संपूर्ण भारतात पती पत्नींनी एकमेकांना सरळ नांवाने संबोधू नये हा संकेत असला तरी केवळ महाराष्ट्रातच उखाण्यात नांव घेण्याची प्रथा सर्व जाती जमातीत रूढ आहे. सण, उत्सव, हळदीकुंकू, लग्नविधी इ.प्रसंगी हे उखाणे घेतले जातात. हे उखाणे दोन चरणी असतात. पहिल्या चरणाचा दुसऱ्या चरणाशी संबंध नसतो. फक्त दोन्ही चरणात यमक मात्र साधलेले असून पहिल्या चरणात काहीतरी आशय असतो व दुसऱ्या चरणातील पूर्वार्धात नवऱ्याचे नांव घेवून वेगळ्यच अर्थाचे पद योजून उखाणा पूर्ण केला जातो. काही ठिकाणी दोन चरणी उखाण्यांऐवजी लांबलचक उखाणेही घेतले जातात. त्याच्या लांबीविषयी काही संकेतही नसतो. मुक्तपणे व उत्स्फुर्तपणे हे उखाणे घेतले जातात. ही रचना ठरीव नसते. तसेच यामध्ये प्रत्येकवेळेस स्थिती, काळ व व्यक्तीपरत्वे बदल होवू शकतो. लवचिकता, यमकानुप्रासाचा वापर, रचना वैविध्य, कधीतरी सूचकता, सासरच्या माणसांचा मान राखणे, आदर करणे इ.नांव घेण्याच्या उखाण्यांची वैशिष्टये सांगता येतील. या उखाण्यांमध्ये अविवाहीत मुलींनी, विवाहीत महिलांनी, विधवा स्त्रियांनी व पुरूषांनी घ्यावयाचे उखाणे असे व्यक्तीपरत्वे वेगळेपण दिसून येते. तसेच दीर्घ उखाणा हाही याचा एक प्रकार सांगता येईल.

### २.१.१ अविवाहित मुलींनी घ्यावयाचे उखाणे

या उखाण्यांमधून अविवाहीत मुलींचे कल्पनाचातुर्य, इच्छा–आकांक्षा व्यक्त होतात. "ह्य कोनाड्य ठेवले गहू, त्या कोनाड्यत ठेवले गहू, आई–बापांनी लग्न नाही केलं

तर नाव कोणाचं घेऊ?"

"समोरच्या कोनाड्यत ठेवलं तिखट, आई–बापांनी लग्न नाही केलं तर,

नांव कुणाचं घेऊ फुकट?"[१४]

"गव्हात गहू बन्सी गहू, लग्नझालं नाहीतर, नांव कसं घेऊ?"

### २.१.२ विवाहित स्त्रियांनी घ्यावयाचे उखाणे

हे उखाणे लग्न ठरल्यापासून विवाहाच्या वेळी होणारे सर्व विधी, कंकण बांधणे, सप्तपदी, घास भरविणे, गृहप्रवेश, हळदीकुंकू, हळद खेळण्याचा विधी, गोंधळ, डोहाळे जेवण, बारसे, मुंज इ.अशा विविध प्रसंगी घेतले जातात. या उखाण्यांमधून इशस्तवनपासून पौराणिक कथाभाग, समाज, संस्कृति व इतिहासाचे दर्शन, परंपराप्रियता, नातेसंबंध, सासर व माहेरच्यांचा मान सन्मान, संसाराची स्वप्नं, तिच्या इच्छा आकांक्षा असे अनेक विषय प्रतिबिंबित होतात. उदा.

"माहेरच्या निरंजनात सासरची फुलवात,
...................... चं नांव घ्यायला आज करते सुरवात"

"हिमालयाच्या उत्तरेस मानस सरोवर,
जन्माचा प्रवास करते .................. च्या बरोबर"

"सांजवात लावताना माहेरच्या येतात आठवणी
.................. रावांसाठी केली माझी पाठवणी"

**दीर्घ उखाणा**

''जीन्–जीन् जीन्यात, बसले मेण्यात, गेले पुण्यात, पुण्यात पाहिला शनिवार वाडा, शनिवार वाड्यची घेतली हवा, अगोदर मुंगी पैठणी दावा, मुंगी पैठणी नेसले साडी, थेट चढली माडी, माडीवरून देखली पंढरी, पंढरीत चंद्रभागा नदी, चंद्रभागा नदीत पाच नावा, देहू आळंदी ज्ञानदेव तुकारामांची, झाड झुंबराच, फूल उंबरांच, लाटणं पिंपळाचं, सूजी गव्हाची, बहीण भावाची, लेक कुणाची? आई–बापाची, सून कुणाची सासू–सासऱ्याची, पत्नी कुणाची–भर्ताराची, भर्तार–भर्तार म्हटलं, नांव नाही घेतलं, नाशिकची द्राक्षे, घोलवडचं चिक्कू, नागपूरची संत्री, अहमदाबादची बोरं, कोकणच फणस, फणसाचं गरं, खाताना लागत्यात बरं आणि आज आपल्यासमोर .............. .चं नांव घेताना तान् भूक हारं''

या प्रकारच्या उखाण्यांमधून काही सूचित करावयाचे नसते. किंबहुना त्याच्या लांबीविषयी काही संकेतही नसतो. पण उखाणा म्हणणाऱ्या स्त्रीजवळील शब्दभांडार मात्र लक्षात येते. यमक व अनुप्रासयुक्त रचनेमुळे उखाण्यात लय व तालबध्दता येऊन म्हणताना ठसकेबाजपणा दिसून येतो. त्यामुळे त्यात नादमयता निर्माण होऊन श्रुतिसुभगता येते.

### २.२.३ विधवा स्त्रियांनी घ्यावयाचे उखाणे

हा एक मजेशीर उखाण्याचा प्रकार होय. एखादी विधवा आजी असेल तर तिच्याभोवती तिच्या नाती तिला उखाणा घ्यावयास लावतात.

शंकराच्या देवळात ओवाळीत होते आरती, हे गेले वरती न् मी राहिली खालती (पृ.

क्र.२५२)

## २.२.४ पाट झालेल्या स्त्रियांनी घ्यावयाचे उखाणे

एखाद्या स्त्रीचा नवरा तिला सोडून गेला असेल किंवा काही कारणास्तव त्याने तिला सोडली असेल, सुदैवाने तिचं दुसरं लग्न (पाट) झालं असेल तर तिलाही हळदीकुंकवाच्या प्रसंगी उखाणा घ्यावा लागतो.

गंगारामने आणला गवताचा कवळा–कवळा भारा,

गंगाराम मेला म्हणून सखाराम केला.[१५]

या सर्व प्रकारच्या उखाण्यांमधून स्त्रियांची विनोदवृत्ती तसेच कल्पनाचातुर्य प्रत्ययास येते. विनोदातील वेचक शब्द, आटोपशीर भावनांची गुंफण, विचारसौंदर्य, कलात्मक भावनाविष्कार वाखाणण्यासारखा आहे व सुशिक्षित मनाला अचंबा वाटायला लावणारा आहे.

## २.२.४ पुरुषांनी घ्यावयाचे उखाणे

स्त्रियांच्या तुलनेत पुरूषांनी घ्यावयाच्या उखाण्यांचे प्रमाण बरेच कमी असले तरी या उखाण्यामध्ये कलात्मकता, विनोद, कल्पनाचातुर्य असल्याचे दिसून येते.

"भाजीत भाजी मेथीची, ................ माझ्या प्रितीची"

"रानातल्या कोकिळा बोलती गोड,.................... रानी माझ्या तळहाताचा फोड"

"विटावर विटा १०० विटा................ नांव घेतो, आता इथनं सगळीजण फुटा"

"साखरेचं पोतं घुशीनं उसवलं,................. मला पावडर लावून फसवलं"

"समोर होती खुंटी, खुंटीला होतं दावं,मी जाईल तिकडं ................... न यावं"

## २.३ व्याही विहिणीचे उखाणे

प्रश्न विरहित उखाण्यांचा हा प्रकार प्रामुख्याने लग्नात रूखवताच्या वेळी विहिनबाईची थट्टा करण्यासाठी घेतले जातात. यामध्ये बऱ्याचवेळा अश्लीलता, शिवराळपणा व भांडखोरपणा दिसून येतो. खरेतर मानसन्मानाच्या हेतूने विहिणी व करवल्या यांच्यात या उखाण्यांची जणू स्पर्धाच लागलेली असते. याचे स्वरूप प्रश्नोत्तरात्मक नसले तरी ते मनाला झोंबणारे असते. मानापमानाबरोबर थट्टा मस्करी करताना हे उखाणे घेतले जातात.

आळा गोटा निळा गोटा, विहिणबाईचा ठमकाच मोठा

आलं आलं रूकवत,त्यात होती बुगडी विहिणी विहिणी घालतात मांडवातफुगडी

मांडवाच्या दारी पेरले धने विहिणबाईच्या बेंबीत बेडूक कण्हे

मांडवाच्या दारी पडलं टिपरं विहिणीला पोर झालं झिपरं (पृ.क्र.२५३)

काही वेळा अद्‌भुतताही या उखाण्यांमधून दिसून येते.

नवरा नवरी सुताएवढी, नवऱ्याची आई भुताएवढी (पृ.क्र.२५४)[१६]

याशिवाय रूखवाताचे खाद्यपदार्थ व इतर वस्तूंचे वर्णन करून ते विहिणीशी जोडलेले असते. यामधून सामाजिक, शारीरिक व्यंग व जीवनातील विसंगतीचे चित्रण दिसून येते. दोन किंवा तीन चरणी रचना, यमक रचना, साधी सोपी सुटसुटीत व आटोपशीर रचना, शब्दांची समर्पक मांडणी, ठसकेबाजपणा व लयबध्दता असल्याचे दिसून येते

## ३) मनोरंजनात्मक उखाणे

मनोरंजनाच्या हेतूने या उखाण्यांची निर्मिती झाली असून हे उखाणे पुरूषांमध्ये जास्त प्रचलित आहेत. याचे स्वरूप कोड्यासारखे आहे. समोरच्या व्यक्तीला विचारप्रवृत्त करून त्याचे चातुर्य अभ्यासणे, मनोरंजन करणे हा हेतू असतो. सरळ, सुटसुटीत, मोजक्या शब्दात गुंफून त्याची उकल करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तींची गरज असते.उदा.

झाडावर झरा (नारळ)

पतीवाचून सती (शेणाची गोवरी)

हिरवं लुगडं नेसली, झाडावर जावून बसली(मिरची)

करडी कोंबडी, मान वाकडी

बत्तीस पिलांची आई एकली (केळी)

हरण पळतं, दूध गळतं (जातं)

यावरून अति प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या उखाण्यांचे स्वरूप व त्यातील स्थित्यंतरे समजून येतील.

## उखाण्याची सद्य:स्थिती

उखाण्यांची ही परंपरा पहिल्यानंतर सद्यस्थितीत जेव्हा आपण या लोककलेचा विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की जोपर्यंत मनोरंजनाची साधने मर्यादित होती तोपर्यंत प्रतिभासंपन्न स्त्रियांना सहजतेने हे उखाणे सुचत होते. एकीकडून दुसरीकडे, दुसरीकडून तिसरीकडे असे अनेक ठिकाणी या उखाण्यांचा प्रचार प्रसार होत होता परंतु आज व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक, सोशलमिडीया या सर्व मनोरंजनाच्या नवनवीन साधनामुळे महाराष्ट्रातील उखाणे ही प्रसिध्द लोककला लोप पावत चालली आहे. आज जे उखाणे घेतले जातात त्यासाठी नवीन उखाणा तयार न करता सोशल मिडीयावरील संग्रहीत उखाण्यांचा आधार घेतला जातो. त्यामुळे नवीन उखाण्यांची निर्मिती होत नाही.

अलिकडे मानवी जीवन प्रचंड व्यस्त व व्यग्र झाले असल्याने कोणत्याही सण, उत्सव हा औपचारिकपणे साजरा केला जात आहे. विवाहप्रसंगातील धामधूम बंद होऊन अगदी काही वेळात संपूर्ण विधी उरकल्या जाती. पूर्वीकाळी खूप वेळ चालणारा उखाण्यांचा खेळ अलिकडे बंद होऊ लागला आहे. अनेक सुशिक्षित स्त्रिया उखाणे तयार करणे, उखाणे घेणे याला गावंढळपणा समजतात. पारंपारिक कोणत्याही विधीला नाक मुरडतात. म्हणून केवळ उखाणेच नव्हे तर सणवार, उत्सव प्रसंगीचे पारंपारिक विधी, लोककला लोप पावत चाललेल्या दिसून येतात. 'जुने ते सोने आणि नवे ते हवे' या पध्दतीनं खरे तर मानवी जीवन जगल्यास अधिक आनंदी उत्साही जीवन जगता येईल. म्हणून या सगळया लोककलांचे जतन संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

## निष्कर्ष

१. उखाण्यांना अतिप्राचीन परंपरा आहे.

२. उखाण्याचे स्वरूप बदलत गेले तरी त्याचा मूळ गाभा तोच आहे.

३. उखाण्यांचा वापर सण, उत्सव, विवाह इ. प्रसंगी व फुरसतीच्यावेळी केला जातो.

४. 'गोपन' हा उखाण्याचा प्राण आहे.

५. उखाण्यांमध्ये दोन किंवा अधिक व्यक्तींचा सहभाग असतो.

६. उखाण्यांमुळे बुध्दीचातुर्याला आवाहन केले जाते.

७. अतिप्राचीन उखाण्यांमधून ईश्वर व सृष्टीच्या गुढतेचा शोध घेतला गेला आहे.

८. प्राचीनकाळात उखाण्यांची ही निर्मिती निष्णात पंडित व विद्वज्जनांच्या मनोरंजनासाठी झाली असल्याचे
दिसून येते.

९. स्पर्धात्मकता अथवा तोडीसतोड असणे हा उखाण्यांचा महत्वाचा विशेष होय.

१०.प्रश्नोत्तरी, कोडे, कूट यासारखे उखाणे पुरूषांमध्ये तर प्रश्नविरहीत व साधे उखाणे स्त्रियांमध्ये प्रचलित आहेत.

## संदर्भग्रंथ


१. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.). मराठी विश्वकोश खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, मुंबई, प्रथम प्रकाशन, नोव्हेंबर, १९७६, पृ.क्र.७१६

२. कालभूत पुरूषोत्तम. लोकसाहित्य : स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली १० जानेवारी,२०१७, पृ.क्र.२४३.

३. मांडे प्रभाकर. मौखिक वाङ्मयाची परंपरा (स्वरूप आणि भवितव्य), गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली,२४ मार्च, २०१०, पृ. क्र. ५६१.

४. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) व होडारकर पद्मजा, भारतीय संस्कृतिकोश, सहावा खंड, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती १९७०, पृ.क्र.३२१

५. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.).व होडारकर. पद्मजा. भारतीय संस्कृतिकोश प्रथम खंड, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती १९६२, पृ.क्र.५९२

६. कालभूत पुरूषोत्तम. उ,नि., पृ.क्र.२४५

७. मांडे प्रभाकर. उ.नि.. पृ.क्र.५७६

८. कालभूत पुरूषोत्तम. उ. नि. पृ.क्र.२४६

९. पृ.क्र.५९२ रेळेकर निवृत्तीनाथ. नां. व गोंदकर धों.ए.(संपा.). संत नामदेवांची अभंगगाथा, संत शिरोमणी नामदेव महाराज, त्यांचे कुटुंबीय आणि संत जनाबाई : संजीवन –समाधी : षष्ठशतकोत्तर सुवर्णमहोत्सव राष्ट्रीय समिती, प्रकाशन १० ऑगस्ट १९९९ पृ.क्र.४२०

१०.मांडे प्रभाकर. उ.नि.. पृ.क्र.५७६

११. कालभूत पुरूषोत्तम. उ. नि. पृ.क्र. २४८

१२.तत्रैव, पृ.क्र.२४९

१३.तत्रैव, पृ.क्र.२५०

१४.तत्रैव, पृ.क्र.२५२

१५.तत्रैव, प.क्र.२५२

१६.तत्रैव, प.क्र.२५४


**कु. भारती श्रीधर कोळेकर**

मु.पो. पेठ वडगाव, ता.हातकणंगले,

जि.कोल्हापूर

Emall – bharatikolekar2012@gmail.com

भ्रमणध्वनी –७८७५६९४५६८